# मेट्रो ३ : ९७ टक्के भुयारीकरण पूर्ण

**। मुंबई** : कुलाबा-वांद्रे-सिप्झ या मेट्रो ३ मार्गिकेच्या भुयारी मार्गिकेदरम्यान ९७ टक्के बोगदे पूर्ण केले असून ८२ टक्के नागरी काम पूर्ण केले आहे. १६ हजार हून अधिक कामगार कार्यरत असून एप्रिल २०२० ते डिसेंबर २०२१ दरम्यान पाच हजार कोटींहून अधिक किमतीची कामे पार पडली आहे. एमएमआरसीएलचे व्यवस्थापकीय संचालक रणजित सिंग देओल यांनी मेट्रो ३ च्या कामाचा आढावा घेतल्यानंतर ही माहिती दिली.

मेट्रो ३ च्या मार्गिकेदरम्यान कफ परेड, विधान भवन, चर्चगेट, हुतात्मा चौक, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई सेंट्रल, सिद्धिविनायक, सीएसएमटी टी-२, मरोळ, एमआयडीसी आणि सिप्झ ही अकरा स्थानके ८५ टक्क्यांहून अधिक पूर्णत्व दर्शवत आहेत. महालक्ष्मी, विज्ञान संग्रहालय, वरळी, दादर, धारावी, बीकेसी, विद्यानगरी, सांताक्रुझ, सीएमएमटी टी १, सहार रोड या स्थानकांचे काम ७५ टक्के



पूर्ण झाले आहेत. तर गिरगाव, काळवादेवी, ग्रँट रोड, शीतलादेवी, आचार्य चौक या स्थानकांचे काम ५० टक्के काम पूर्ण झाले आहे.

**१६ हजारांहून अधिक कामगार कार्यरत**

एप्रिल २०२० ते डिसेंबर २०२१ या कालावधीत ६ हजार ७२१ मीटर टनेलिंग सेग्मेंट रिंग काम पूर्ण करण्यात आले आहे. मेट्रो स्थानकांवर १६ एस्केलेटर वितरित करण्यात आले असून त्यापैकी सिद्धिविनायक स्थानक व एमआयडीसी स्थानकांचा समावेश आहे. तर ४ लिफ्ट वितरित करण्यात आल्या आहेत. तर येणाऱ्या वर्षात २०२२ मध्ये बोगदे पूर्ण करणे, यंत्रणा बसवणे, स्थानकांचे स्थापत्य पूर्ण करणे, ट्रॅकची कामे पूर्ण करण्यात येणार आहेत.